08 JUL 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाकडून सुविधा : संगणक केंद्राकडून प्रणालीची निर्मिती

# विद्यार्थ्यांना दुबार गुणपत्रिका ऑनलाईन मिळणार

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना आता दुबार गुणपत्रिका ही ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे मिळणार आहे. या प्रणालीचे लोकार्पण बुधवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले.

दुबार गुणपत्रिकेचे ऑनलाईन सुविधा (studentapps. unishivaji.ac.in/suksfc) लिंकसह (online.unishivaji.ac.in) या पेजवर (students online applications) या टॅबवरही उपलब्ध असणार आहे. या सेवेमुळे विद्यार्थ्यांचा येण्या-जाण्याचा खर्च, वेळ वाचणार आहे. त्यांना कोरोनाच्या पार्श्वभूमीवर जागेवर गुणपत्रिका उपलब्ध होऊ शकणार आहे. यापुढील काळात विद्यार्थीभिमुख अन्य सेवांचेही टप्प्याटप्प्याने संगणकीकरण करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले. यावेळी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य अमित कुलकर्णी, संगणक केंद्राच्या प्रभारी संचालक स्वाती खराडे, आदी उपस्थित होते. दरम्यान, विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्रामार्फत दुबार गुणपत्रिका घेण्यासाठी प्रत्यक्ष उपस्थित राहून अर्ज व शुल्क भरण्याची प्रक्रिया करावी लागत असे. यात विद्यार्थ्यांचा वेळ, पैसा खर्च होत असे. ही बाब लक्षात घेऊन विद्यापीठाने ऑनलाईन संगणक प्रणाली स्वनिर्मित केली आहे. अर्जदारास ऑनलाईन अर्ज सादर करणे, पेमेंट गेटवेद्वारे शुल्क भरणे या बाबी ऑनलाईन स्वरूपात करता येणार आहेत. अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जदार विद्यार्थ्यास दुबार गुणपत्रिकेची सॉफ्ट कॉपी नोंदणीकृत ई-मेलवर तातडीने पाठविण्यात येईल. त्याचप्रमाणे त्याची मूळ दुबार गुणपत्रिका अर्जदाराकडून विहीत शुल्क आकारून त्याने नोंदविलेल्या पत्त्यावर टपालाद्वारे किंवा हस्ते दिली जाईल.



शिवाजी विद्यापीठात बुधवारी विद्यार्थी सुविधा केंद्राच्या दुबार गुणपत्रिका ऑनलाईन पोर्टलचे लोकार्पण कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी शेजारी अमित कुलकर्णी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 JUL 2021
पुढारी

संक्षिप्त



कोल्हापूर : प्रिया पाटील हिचा ग्रंथभेट देऊन सत्कार करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत अभय जायभाये, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. एच. बी. पाटील, प्रा. संदीप पाटील, चंद्रशेखर दोडमणी. (छाया : पप्पू अत्तार)

# विद्यापीठातर्फे प्रिया पाटीलचा सत्कार

**कोल्हापूर :** कोरोना काळात प्रिया पाटील हिने सेवाभावाचा एक नवा आदर्श निर्माण केला आहे. तिचे मदतकार्य सर्व तरुणाईसाठी कौतुकास्पद आणि प्रेरणादायी आहे, अशा शब्दांत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पाटील हिचा गौरव केला. प्रिया विवेकानंद महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेची स्वयंसेविका असून सध्या शववाहिकेवर चालक म्हणून सेवा देत आहे. बुधवारी कुलगुरू शिर्के यांच्या हस्ते प्रिया हिचा ग्रंथभेट देऊन सत्कार केला. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे संचालक अभय जायभाये, विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, कार्यक्रम अधिकारी डॉ. एच. बी. पाटील, कार्यक्रम अधिकारी प्रा. संदीप पाटील, अधीक्षक चंद्रशेखर दोडमणी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 JUL 2021

पुढारी

# विद्यापीठाच्या दुबार गुणपत्रिकेसाठी ऑनलाईन संगणकप्रणालीचे लोकार्पण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्रामार्फत दुबार गुणपत्रिकांसाठीची आवश्यकता ऑनलाईन संगणक प्रणालीचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि व्यवस्थापन परिषदेचे राज्यपाल नियुक्त सदस्य अमित कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले. दुबार गुणपत्रिका आवश्यक असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही चांगली सोय झाली.

कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते studentapps.unishivaji.ac.in/suksfc/ या लिंकवर क्लिक करून या सुविधेचे लोकार्पण कले. वरील लिंकसह online.unishivaji.ac.in या पेजवर students online applications या टॅबवरही ही सेवा उपलब्ध आहे.

या सेवेमुळे विद्यार्थ्यांचा येण्या-जाण्याचा खर्च, वेळ वाचणार आहे. यापुढील काळात विद्यार्थीभिमुख अन्य सेवांचेही टप्प्याटप्प्याने संगणकीकरण करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी याप्रसंगी केले. यावेळी विद्यापीठाच्या संगणक केंद्राच्या प्रभारी संचालक स्वाती खराडे यांच्यासह त्यांचे सहकारी उपस्थित होते.

0 8 JUL 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ उन्हाळी परीक्षांच्या तारखा जाहीर

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदव्युत्तरच्या मार्च-एप्रिल २०२१ उन्हाळी परीक्षांचे अर्ज भरण्याच्या तारखा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर झाल्या आहेत. विद्यार्थ्यांना कोरोना नियमांचे पालन करीत नियमित शुल्कासह अर्ज भरावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी परिपत्रकाद्वारे केले आहे.

पदव्युत्तर मार्च एप्रिल २०२१ परीक्षांच्या वेळापत्रकासह परीक्षा अर्ज शुल्कही विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध झाले आहे. पदव्युत्तर अधिविभागांनी नियमित शुल्कासह १४ जुलै, विलंब शुल्कासह १६ ते १९ जुलै तर अतिविलंब शुल्कासह २३ ते २६ जुलैपर्यंत अर्ज विद्यापीठाकडे सादर करावयाचे आहेत. तर, महाविद्यालय व अधिविभागांनी नियमित शुल्कासह १७ जुलै, विलंब शुल्कासह २३ जुलै अतिविलंब शुल्कासह २८ जुलैपर्यंत विद्यापीठाकडे अर्ज सादर करावयाचे आहेत. तरी विद्यार्थी, महाविद्यालय व अधिविभागांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक पळसे यांनी केले आहे.

**विद्यापीठाच्या फेरपरीक्षा सुरळीत**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदवीधरच्या फेरपरीक्षा बुधवारी सुरळीत पार पडल्या. बुधवारी ६३६७ पैकी ५५१६ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली. यामध्ये बी. ए. बी. कॉम., बी. एस्सी., एम. ए. एम. एस्सी., एम. कॉम., बी. बी. ए. बी. सी. ए.. एम. सी. ए. एम. एस. डब्ल्यू, पीजी डीग्री इन मास्टर ऑफ व्हॅल्युएशन, बी. व्होक., बी. टेक., बी. एस्सी., एम. एस्सी. नॅनो सायन्स टेक्नॉलॉजी, एम. बी. ए. इन रूरल मॅनेजमेंट, जर्नालिझम यासह अन्य परीक्षांचा समावेश आहे.

0 8 JUL 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऑनलाईन संगणक प्रणालीचे लोकार्पण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्रामार्फत दुबार गुणपत्रिकांची आवश्यकता असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी ऑनलाईन संगणक प्रणालीचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि व्यवस्थापन परिषदेचे कुलपतीनियुक्त सदस्य अमित कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले.

यापुढील काळात विद्यार्थीभिमुख अन्य सेवांचेही टप्प्याटप्प्याने संगणकीकरण करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले.

विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्रामार्फत दुबार गुणपत्रिका घेण्यासाठी प्रत्यक्ष उपस्थित राहून अर्ज व शुल्क भरण्याची प्रक्रिया करावी लागत असे. यात विद्यार्थ्यांचा वेळ आणि पैसा खर्च होत असे. ही बाब लक्षात घेऊन विद्यापीठाने ऑनलाईन संगणक प्रणाली स्वनिर्मित केली आहे.

या प्रणालीद्वारे अर्जदारास ऑनलाईन अर्ज सादर करणे, पेमेंट गेटवेद्वारे शुल्क भरणे या बाबी ऑनलाईन स्वरूपात करता येणार आहेत. अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जदार विद्यार्थ्यास दुबार गुणपत्रिकेची सॉफ्ट कॉपी नोंदणीकृत ई-मेलवर तातडीने पाठविण्यात येईल. त्याचप्रमाणे त्याची मूळ दुबार गुणपत्रिका अर्जदाराकडून विहीत शुल्क आकारून त्याने नमूद केलेल्या पत्त्यावर टपालाद्वारे अगर हस्ते देण्यात येईल.

विद्यापीठाच्या संगणक केंद्राच्या प्रभारी संचालक स्वाती खराडे यांच्यासह त्यांचे सहकारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 JUL 2021
सकाळ



उजळाईवाडी : शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्राच्या दुबार गुणपत्रिका ऑनलाईन पोर्टलचे लोकार्पण करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, अमित कुलकर्णी.

# दुबार गुणपत्रिकेसाठी ऑनलाईन प्रणालीचे लोकार्पण

उजळाईवाडी, ता. ७ : शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्रामार्फत दुबार गुणपत्रिकांची आवश्यकता असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी ऑनलाईन संगणक प्रणालीचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि व्यवस्थापन परिषदेचे कुलपतीनियुक्त सदस्य अमित कुलकर्णी यांच्या उपस्थितीत लोकार्पण केले. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते studentapps.unishivaji.ac.in/suksfc/ या लिंकवर क्लिक करून या सेवेचे लोकार्पण केले. या लिंकसह online.unishivaji.ac.in या पेजवर students online applications या टॅबवरही सेवा उपलब्ध असणार आहे. या सेवेमुळे विद्यार्थ्यांचा येण्याजाण्याचा खर्च, वेळ वाचणार आहे. तसेच त्यांना सध्याच्या कोविड-१९ साथीच्या कालखंडात जागेवर गुणपत्रिका उपलब्ध होऊ शकणार आहेत. यापुढील काळात विद्यार्थीभिमुख अन्य सेवांचेही टप्प्याटप्प्याने संगणकीकरण करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले.

विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्रामार्फत दुबार गुणपत्रिका घेण्यासाठी प्रत्यक्ष उपस्थित राहून अर्ज, शुल्क भरण्याची प्रक्रिया करावी लागत असे. यात विद्यार्थ्यांचा वेळ आणि पैसा खर्च होत असे. ही बाब लक्षात घेऊन विद्यापीठाने ऑनलाईन संगणक प्रणाली स्वनिर्मित केली आहे. या प्रणालीद्वारे अर्जदारास ऑनलाईन अर्ज करणे, पेमेंट गेटवेद्वारे शुल्क भरणे या बाबी ऑनलाईन स्वरूपात करता येणार आहेत. अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जदार विद्यार्थ्यास दुबार गुणपत्रिकेची सॉफ्ट कॉपी नोंदणीकृत ई-मेलवर तातडीने पाठविण्यात येईल. तसेच त्याची मूळ दुबार गुणपत्रिका अर्जदाराकडून विहीत शुल्क आकारून त्याने नमूद केलेल्या पत्त्यावर टपालाद्वारे अगर हस्ते देण्यात येईल. प्रभारी संचालक स्वाती खराडे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 JUL 2021
सकाळ



उजळाईवाडी : प्रिया पाटीलचा ग्रंथ भेट देऊन सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी अभय जायभाये, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. एच. बी. पाटील, प्रा. संदीप पाटील, चंद्रशेखर दोडमणी.

# प्रिया पाटील हिचा शिवाजी विद्यापीठातर्फे गौरव

उजळाईवाडी, ता. ७ : ''कोरोना काळात प्रिया पाटीलने सेवाभावाचा आदर्श निर्माण केला. तिचे मदतकार्य कौतुकास्पद आहे,'' अशा शब्दांत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी तिचा गौरव केला.

विवेकानंद महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाची स्वयंसेविका असलेली प्रिया कोल्हापूरमध्ये कोविड-१९ मुळे मृत्यू पावलेल्या नागरिकांचे मृतदेह नेणाऱ्या शववाहिकेवर चालक म्हणून सेवा देते. दीड महिन्यापासून सेवाभावी वृत्तीने ती कार्यरत आहे. कोरोनाबाधितांना रुग्णालयात दाखल करण्यापासून ते त्यांच्या कुटुंबाला आधार देत कोरोनाग्रस्ताच्या निधनानंतर मृतदेहाला शववाहिकेतून स्मशानभूमीपर्यंत नेऊन प्रसंगी अंत्यसंस्कार करण्याचे कामही करते. आजपर्यंत २४० हून अधिक मृतदेह वाहून नेऊन तिने अंत्यसंस्कार केले आहेत. प्रियाला डॉ. शिर्के यांच्या हस्ते ग्रंथ भेट देऊन तिचा सत्कार केला. राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे संचालक अभय जायभाये, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, कार्यक्रम अधिकारी डॉ. एच. बी. पाटील, कार्यक्रम अधिकारी प्रा. संदीप पाटील, अधीक्षक चंद्रशेखर दोडमणी उपस्थित होते.

08 JUL 2021

जनसंपर्क कक्ष


तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दुबार गुणपत्रक संगणक प्रणालीचे उद्घाटन

## विद्यार्थ्यांना घरीच मिळणार ऑनलाईन गुणपत्रक : वेळ, खर्चाची होणार बचत

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्रामार्फत दुबार गुणपत्रिकांची आवश्यकता असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी ऑनलाईन संगणक प्रणालीचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य अमित कुलकर्णी यांच्या यांच्या हस्ते करण्यात आले. या संगणक प्रणालीचा लोकार्पण सोहळा पार पडला.



कोल्हापूर : संगणक प्रणालीचे उद्घाटन करताना कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के. सोबत व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत अधिविभाग व महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांना दुबार गुणपत्रक हवे असेल अशा विद्यार्थ्यांनी studentapps.unishivaji.ac.in/suksfc/ या लिंकवर क्लिक करून आपले गुणपत्रक घ्यावे. विद्यापीठाच्या online.unishivaji.ac.in या पेजवर students online application या टॅबवरही ही सेवा उपलब्ध आहे. या सेवेमुळे विद्यार्थ्यांचा येण्याजाण्याचा खर्च, वेळ वाचणार आहे. कोरोनाच्या कालावधीतही घरात बसून विद्यार्थ्यांना गुणपत्रक उपलब्ध होऊ शकते. भविष्यात विद्यार्थीभिमुख अन्य सेवांचेही टप्प्याटप्प्याने संगणकीकरण करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. शिर्के यांनी केले आहे. विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्रामार्फत दुबार गुणपत्रिका घेण्यासाठी प्रत्यक्ष उपस्थित राहून अर्ज व शुल्क भरण्याची प्रक्रिया करावी लागत असे. यात विद्यार्थ्यांचा वेळ आणि पैसा खर्च होतो. ही बाब लक्षात घेऊन ऑनलाईन संगणक प्रणाली स्वनिर्मित केली आहे.

अर्जदारास ऑनलाईन अर्ज सादर करणे, पेमेंट गेटवेद्वारे शुल्क भरणे या बाबी ऑनलाईन स्वरुपात करता येणार आहेत. अर्ज प्राप्त झाल्यानंतर अर्जदार विद्यार्थ्यास दुबार गुणपत्रिकेची सॉफ्ट कॉपी नोंदणीकृत ई-मेलवर तातडीने पाठविण्यात येईल, त्याचप्रमाणे त्याची मूळ दुबार गुणपत्रक अर्जदाराकडून विहीत शुल्क आकारून दिलेल्या पत्त्यावर टपालाद्वारे किंवा प्रत्यक्ष देण्यात येईल. यावेळी संचालक स्वाती खराडे यांच्यासह त्यांचे सहकारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 JUL 2021
तरुण भारत

# पदव्युत्तरचे परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा जाहीर

- बुधवारी झालेल्या फेरपरीक्षा सुरळीत
- परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदव्युत्तरच्या मार्च-एप्रिल २०२१ उन्हाळी परीक्षांचे अर्ज भरण्याच्या तारखा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर झाल्या आहेत. तरी विद्यार्थ्यांना कोरोनाच्या नियमांचे पालन करीत नियमित शुल्कासह अर्ज भरावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी परिपत्रकाव्दारे केले आहे.

पदव्युत्तर मार्च-एप्रिल २०२१ परीक्षांच्या वेळापत्रकासह परीक्षा अर्ज शुल्कही विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध झाले आहे. पदव्युत्तर अधिविभागांनी नियमित शुल्कासह १४ जुलै, विलंब शुल्कासह १६ ते १९ जुलै तर अतिविलंब शुल्कासह २३ ते २६ जुलैपर्यंत अर्ज विद्यापीठाकडे सादर करावयाचे आहेत. तर महाविद्यालय व अधिविभागांनी नियमित शुल्कासह १७ जुलै, विलंब शुल्कासह २३ जुलै, अतिविलंब शुल्कासह २८ जुलैपर्यंत विद्यापीठाकडे अर्ज सादर करावयाचे आहेत. तरी विद्यार्थी, महाविद्यालय व अधिविभागांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहनही केले आहे.

## विद्यापीठाच्या फेरपरीक्षा सुरळीत

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदवीधरच्या फेरपरीक्षा बुधवारी सुरळीत पार पडल्या. बुधवारी ६३६७ पैकी ५५१६ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली. यामध्ये बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., एम. ए., एम. एस्सी., एम. कॉम., बी. बी. ए., बी. सी. ए., एम. सी. ए., एम. एस. डब्ल्यू., पीजी डीग्री इन मास्टर ऑफ व्हॅल्युएशन, बी. व्होक, बी. टेक, बी. एस्सी., एम. एस्सी. नॅनो सायन्स टेक्नॉलॉजी, एम. बी. ए. ईन हाॅस्पिटल मॅनेजमेंट, जर्नालिझम यासह अन्य परीक्षांचा समावेश आहे.